महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

क्र.. मासंवि/मावक/२६८७१
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : managerbcrrc@gmail.com
Website : www.mahadiscom.in

दिनांक : ०३/११/२०१७

# परिपत्रक

**विषय :** पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. २७९७/ २०१५ संदर्भात दिनांक ०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याबाबत मार्गदर्शनपर सूचना.

**संदर्भ :** १) महाराष्ट्र शासन पत्र क्र.बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२A भाग-१/१६-ब दिनांक ०२ नोव्हेंबर, २०१७.
२) म.रा.वि.वि.कं.मर्या. चे प्रशासकीय परिपत्रक क्र. १०८ दि. १९.०५.२००७.
३) म.रा. वि. मं. प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४३ दिनांक ०३.०१.२००५.

-----------------

आरक्षण कायदा-२००४ नुसार मागासवर्गीयांच्या शासकीय सेवेतील आरक्षणांच्या आदेशांचे योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यासाठी मंत्रालयीन स्तरावर वेळोवेळी शासन परिपत्रकान्वये सूचना/तरतुदी निर्गमित केल्या आहेत.

२. आता, शासनाने पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. २७९७/ २०१५ संदर्भात दिनांक ०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याबाबत मार्गदर्शनपर सूचना संदर्भीत पत्रान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर शासनाच्या पत्राची प्रत सोबत माहितीस्तव जोडण्यात येत आहे.

३. सदर शासनाच्या पत्रातील सूचना/तरतुदीचे काटेकोरपणे पालन होण्यासाठी सर्व संबंधीत अधिकाऱ्यांनी दिनांक ०२ नोव्हेंबर, २०१७ च्या शासनाच्या पत्राचे अवलोकन करावे व सदर पत्रातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

४. दिनांक १३.११.२०१७ रोजी होणाऱ्या सुनावणीच्यावेळी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात येईल.

५. सदर परिपत्रक कंपनीच्या इन्ट्रानेटवर (RAPDRP Portal) उपलब्ध करण्यात आलेले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

३/११

(संदेश हाके)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

C:\Users\ADMIN\Desktop\Promotion_Circular.docx

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक: बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२ A भाग-१/१६- ब,
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरूचौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : २ नोव्हेंबर, २०१७

**प्रति,**

अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
सर्व प्रशासकीय विभाग,
मंत्रालय, मुंबई.

**विषय:-** पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.२७९७/२०१५ संदर्भात दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याबाबत मार्गदर्शनपर सूचना.

**संदर्भ :-** १) मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.२७९७/२०१५ संदर्भात दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेला निर्णय.
२) शासनाचे समक्रमांकाचे दिनांक १८.१०.२०१७ चे पत्र.

विषयांकित प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये, दिनांक २५.५.२००४ चा शासन निर्णय रद्द करुन पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. तथापि, मा.उच्च न्यायालयाने आपल्या दिनांक ४.८.२०१७ च्या निर्णयास १२ आठवडयाची स्थगिती दिली होती. संदर्भाधिन क्र. २ येथील दिनांक १८.१०.२०१७ च्या पत्रान्वये सदर स्थगिती कालावधीत पदोन्नतीमध्ये आरक्षण देऊन पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले होते. हा स्थगिती कालावधी दिनांक २७.१०.२०१७ रोजी संपुष्टात आला आहे. या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या उक्त निर्णयास स्थगिती देण्याच्या अनुषंगाने, मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६ /२०१७ संदर्भात दिनांक ३०.१०.२०१७ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ४.८.२०१७ च्या निर्णयास कोणतीही स्थगिती दिलेली नाही अथवा परिस्थिती "जैसे थे" ठेवण्याबाबत देखिल कोणतेही आदेश दिलेले नाहीत. त्यामुळे शासन निर्णय दि. २५.५.२००४ मधील तरतुदीनुसार मागासवर्गीयांना पदोन्नतीमध्ये आरक्षण देता येणार नाही. यास्तव, मा.सर्वोच्च न्यायालयात दिनांक १३.११.२०१७ रोजी होणा-या सुनावणीपर्यंत सर्व स्तरावरील पदोन्नती प्रक्रिया स्थगित ठेवण्यात यावी तसेच पदोन्नतीसंदर्भातील कोणतेही आदेश निर्गमित होणार नाहीत, याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी व त्यांच्या अधिनस्त सर्व क्षेत्रिय कार्यालयांनी, आस्थापना अधिका-यांनी, नियुक्ती प्राधिका-यांनी दक्षता घ्यावी.

२. दिनांक १३.११.२०१७ रोजी होणा-या सुनावणीच्यावेळी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात येईल.

३. सर्व प्रशासकीय विभागांनी उपरोक्त आदेश त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांना तातडीने निदर्शनास आणून सदर आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.

४. सदर पत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१७११०३११५६१५१००७ असा आहे. हे पत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2017.11.03 11:46:35 +05'30'

(टि.वा.करपते)
उपसचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. राज्यपाल यांचे सचिव,
२. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव,
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मुख्य सचिव,
५. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
६. सर्व विभागीय आयुक्त,
७. सर्व सहायक आयुक्त मागास वर्ग कक्ष,कोकण विभाग,पुणे विभाग,नाशिक विभाग ,नागपूर विभाग,अमरावती विभाग,औरंगाबाद विभाग,
८. सर्व जिल्हाधिकारी,
९. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१०. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
११. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१२. प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१५. राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
१६. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
१७. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
१८. संचालक, समाजकल्याण, पुणे,
१९. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२०. संचालक, सेवायोजन, मुंबई,
२१. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
२२. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
२३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२५. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
२६. सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर पत्राची प्रत,त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
२७. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
२८. निवड नस्ती, कार्यासन -१६ब.